प्रेस नोट
समतानगर पोलीस ठाणे, मुंबई

दिनांक १०/०७/२०२६ रोजी सकाळी सुमारे ११.२५ वा. समतानगर पोलीस ठाणे हद्दीतील दामूनगर परिसराच्या पाठीमागे अंदाजे १ ते १.५ कि.मी. अंतरावरील डोंगराळ भागात अंदाजे १६ ते १८ वर्षे वयोगटातील एका अज्ञात मुलीचा मृतदेह आढळून आल्याची माहिती समतानगर पोलीस ठाण्यास प्राप्त झाली.

सदर माहिती प्राप्त होताच समतानगर पोलीस ठाण्याचे अधिकारी, गुन्हे प्रकटीकरण पथक तसेच पोलीस उपायुक्त श्री. गजानन राजमाने व सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. कैलास बर्वे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. घटनास्थळ सुरक्षित करून घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. घटनास्थळावरील सर्व भौतिक व तांत्रिक पुरावे जतन करण्याच्या दृष्टीने न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा (FSL) पथक तसेच डॉग स्कॉड यांना पाचारण करण्यात आले. घटनास्थळाची अत्यंत बारकाईने पाहणी करून आवश्यक नमुने, ठसे व इतर भौतिक पुरावे संकलित करण्यात आले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

समतानगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी घटनास्थळ परिसर, आजूबाजूचे रहिवासी, बेपत्ता व्यक्तींची नोंद, उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर तांत्रिक साधनांच्या आधारे तात्काळ तपास सुरु केला. तपासानंतर मृत मुलीची ओळख निश्चित करण्यात आली.

मयत मुलीच्या नातेवाईकांची सखोल चौकशी केली असता तिचे सूरज मारुती वाघमारे, वय २१ वर्षे, रा. सरस्वती चाळ, लहूगड, दामूनगर, कांदिवली (पूर्व), मुंबई याच्याशी प्रेमसंबंध असल्याची माहिती निष्पन्न झाली. त्याअनुषंगाने संशयित आरोपीचा बौद्धिक कौशल्याच्या आधारे शोध घेवून गंभीर गुन्ह्याचा उलगडा करण्यात आला

सदरची उल्लेखनीय कारवाई अपर पोलीस आयुक्त श्री. शशीकुमार मीना, पोलीस उपायुक्त श्री. गजानन राजमाने तथा सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. कैलास बर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयवंत शिंदे, पोलीस निरीक्षक सुरज बनसोडे, अजितसिंह राजपूत, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष गंगापूरकर, योगेश रामेकर, योगेश राऊत, स्वप्नील पाटील, पोलीस उपनिरीक्षक अतुल थोरात, सागर देवरुखे, अंकुश गायकवाड, भीमेश कोटला, सुशमा गरड, युवराज टेकवडे, प्राजक्ता फड, समाधान माळी तसेच अंमलदार तोंडवळकर, पोलीस हवालदार किणी, नणावरे, पाटील, भिकले, शिंदे, सपकाळे, रेड्डी तसेच समतानगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तरीत्या पार पाडली.